श्रीमती संगीता महादेव चहाकार-आंब्रे, सहायक महसूल अधिकारी यांच्या राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर कार्यालयातील “लिपिक” या पदावरील प्रतिनियुक्तीच्या कालावधीस अंतिम मुदतवाढ देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

शासन आदेश क्रमांक : संकिर्ण-२०२१/ प्र.क्र.३०/ पापु-०७,

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केट, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई-४०००01

दिनांक :- २२/०६/२०२६

**वाचा -:**

१) शासन आदेश, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. संकिर्ण-२०२१/ प्र.क्र.३०/पापु-०७, दि.०३.०८.२०२१

२) शासन आदेश, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. संकिर्ण-२०२१/ प्र.क्र.३०/पापु-०७, दि.११.१०.२०२४

३) अवर सचिव, राज्य पाणी व स्वच्छता मिशन कार्यालय, बेलापूर नवी मुंबई यांचे क्र. SWSM-१८०११ (३५)/८१/२०२४-Establishment (water supply २५), दि.१२.०१.२०२६, दि.१७.०२.२०२६ व दि.१८.०३.२०२६ रोजींची पत्रे.

४) निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती यांचे क्रमांक कक्ष-२१/आस्था-१/कावि-६३/२०२६, दि.१०.०३.२०२६ रोजीचे पत्र.

## शासन आदेश

श्रीमती संगीता महादेव चहाकार-आंब्रे, सहायक महसूल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांची संदर्भाधीन क्र.१, दि.०३.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयातील “लिपिक” पदावर प्रथमत: तीन वर्षाकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली.

२. तद्नंतर संदर्भाधीन क्र. २, दि.११.१०.२०२४ येथील आदेशान्वये श्रीमती संगीता महादेव चहाकार-आंब्रे, सहायक महसूल अधिकारी यांच्या राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयातील प्रतिनियुक्तीस दि.०१.०९.२०२४ पासून पुढे १ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढीचा कालावधी दि.३१.०८.२०२५ रोजी संपुष्टात आला आहे.

३. आता, या आदेशान्वये श्रीमती संगीता महादेव चहाकार-आंब्रे यांच्या राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई या कार्यालयातील “लिपिक” या पदावरील प्रतिनियुक्तीस दि.०१.०९.२०२५ पासून पुढे १

वर्षाकरीता म्हणजेच दि.३१.०८.२०२६ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे. श्रीमती संगीता महादेव चहाकार-आंब्रे यांच्या प्रतिनियुक्तीच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.१, दि.०३.०८.२०२१ रोजीच्या शासन आदेशातील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

४. सदर मुदतवाढ ही अंतिम स्वरुपाची असून, श्रीमती संगीता महादेव चहाकार-आंब्रे यांना यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच त्यांना मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई कार्यालयाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे सादर करु नये. तसेच, श्रीमती संगीता महादेव चहाकार-आंब्रे, सहायक महसूल अधिकारी यांचा दि.३१.०८.२०२६ रोजीपर्यतचा मुदतवाढीचा कालावधी समाप्त होताच त्यांच्या सेवा मुळ विभागास (जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती) प्रत्यावर्तीत करण्यात याव्यात.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६०६२२१२४००७५४२८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASAD SANJAY SWAMI

Digitally signed by PRASAD SANJAY SWAMI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, 2.5.4.20=aaf002dc55f52d8292cd1b600e0a80b7cf51b57c6f840c909c76407640c157f4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8D84D41A9008354A0AF034B551119753B7D1C967B179AC7110EAA1867A160049, cn=PRASAD SANJAY SWAMI
Date: 2026.06.22 12:54:59 +05'30'

( प्रसाद स्वामी )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -:

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती
६. जिल्हाधिकारी, अमरावती.
७. अभियान संचालक, (जल जीवन मिशन), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
८. उप सचिव (पापु-०७/१०), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अवर सचिव (पापु-७/२५), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
१०. श्रीम.संगीता महादेव चहाकार-आंब्रे, सहायक महसूल अधिकारी (राज्य पाणी व स्वच्छता मिशन कार्यालय, बेलापूर, नवी मुंबई यांच्या मार्फत).
११. निवड नस्ती (पापु-०७)